नगर परिषद/नगर पंचायती सार्वत्रिक निवडणूक-२०१६-१७
आचारसंहिता संपूर्ण जिल्हयाला लागू करण्याबाबत
स्पष्टीकरण

# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक : रानिआ/नप-२०१६/प्र.क्र. ३४/का-६,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : १९ ऑक्टोबर, २०१६.

प्रति,
विभागीय आयुक्त (सर्व)
जिल्हाधिकारी (सर्व)
आयुक्त, महानगरपालिका (सर्व)

विषय:- नगर परिषद/नगर पंचायती सार्वत्रिक निवडणूक-२०१६-१७
आचारसंहिता संपूर्ण जिल्हयाला लागू करण्याबाबत स्पष्टीकरण...
संदर्भ:- राज्य निवडणूक आयोगाचे समक्रमांकाचे दिनांक १७/१०/२०१६ चे पत्र.

महोदय/महोदया,

राज्य निवडणूक आयोगाने संदर्भीय पत्र दिनांक १७/१०/२०१६ अन्वये एका जिल्हयात ४ किंवा त्यापेक्षा अधिक नगर परिषदा/नगर पंचायतींच्या निवडणुका असल्यास संपूर्ण जिल्हयाकरिता आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आल्याचे आदेश निर्गमित केले आहेत.

२. याबाबत अनेक क्षेत्रीय कार्यालयांकडून विचारणा करण्यात येत असल्याने खालीलप्रमाणे स्पष्टीकरण देण्यात येत आहे :-

"निवडणुका नसणाऱ्या जिल्हा परिषद/पंचायत समिती, महानगरपालिका व नगरपरिषदा/नगरपंचायतींना त्यांच्या क्षेत्रातील नेहमीप्रमाणे सर्व कामे व अनुषंगिक बाबी (निवडणुका होणाऱ्या नगरपरिषदा/नगरपंचायतींच्या क्षेत्रातील मतदारांवर विपरीत प्रभाव न टाकणाऱ्या) करण्यावर कोणतेही निर्बंध नाहीत. मात्र, निवडणूक होत असलेल्या नगरपरिषदा/नगरपंचायतीच्या क्षेत्रातील मतदारांवर प्रभाव टाकणारी कोणतीही कृती किंवा

घोषणा निवडणूक नसणाऱ्या महानगरपालिका, जिल्हा परिषद/पंचायत समित्या व नगरपरिषदा/नगरपंचायती; तसेच मंत्री, खासदार, आमदार व कोणत्याही पदाधिकाऱ्यांना करता येणार नाही."

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

(स्वाक्षरी)

( ध. मा. कानेड )
उप सचिव,
राज्य निवडणूक आयोग